ऐक्य
९१ वर्षांची वाचनीय परंपरा
: www.dainikaikya.com सातारा सोमवार दि. ४/१/२०१६ email : news@dainikaik

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव



वाहीद शेख याचा सत्कार करताना किशोर बर्गे, शेजारी विजयसिंह सावंत, रामचंद्र बोतालजी, सुरेश फडतरे व मान्यवर.

# कोरेगाव शहर विकास मंचतर्फे वाहीद शेखचा सत्कार

सातारा, दि.३ : कोरेगाव शहर विकास मंचच्यावतीने डी. पी. भोसले कॉलेजच्या विद्यार्थी जी. एस. पदी निवड झाल्याबद्दल वाहीद शेखचा सत्कार करण्यात आला.

कोरेगाव तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक किशोर बर्गे यांच्या हस्ते वाहीद शेखचा सत्कार करण्यात आला.

बर्गे म्हणाले, विद्यार्थी दशेतच मुलांना नेतृत्व गुण व सांघीक काम करण्याचे कौशल्य प्राप्त होत असते. आलेल्या संधीचे सोने करुन गुणांचे संगोपन करणे प्रत्येकाचे काम आहे. ते वाहीद शेखने करून दाखविले आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न व अडचणी कॉलेज प्रशासना समोर मांडून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देतील. डी. पी. भोसले कॉलेजचे प्राचार्य विजयसिंह सावंत यांनी शिस्त, संस्कार व खेळांकडे विशेष लक्ष देतात. त्यामुळे त्यांच्या कार्यकालात नावलौकिक वाढविणारे विद्यार्थी घडतील यात शंका नाही.

प्राचार्य विजयसिंह सावंत यांनी किशोर बर्गे यांचा सत्कार केला.

प्राचार्य सावंत म्हणाले, कोरेगाव शहर विकास मंच सतत सकारात्मक कामात भाग घेत असतो. किशोर बर्गे यांच्या सारखे व्यक्तिमत्त्व समाजाला बलशाली करण्यासाठी योगदान देत असतात.

यावेळी रामचंद्र बोतालजी, येशुदास वायदंडे, संतोष कदम, सुरेश फडतरे, दत्तगिरी सैयद, सागर चव्हाण, रोहित चव्हाण, नीलेश बोतालजी, विक्रम चव्हाण, रोहित चव्हाण, नीलेश बोतालजी, विक्रम चव्हाण, अभिजित गुरव, विद्यार्थी प्रतिनिधी व विद्यार्थी उपस्थित होते.